# दवबिंदू

ज्योत्स्ना देवधर

रिया पब्लिकेशन्स्

**दवबिंदू : ज्योत्स्ना देवधर**

**© ज्योत्स्ना देवधर**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
ऑक्टोबर, २०११

**किंमत**
रुपये १९०/-

माझ्या

वाचकांना

आभार पूर्वक....

# अनुक्रमणिका


| कथेचे नाव | | पान क्र. |
|---|---|---|
| हुलकावणी | ............ | ७ |
| पांघरूण | ............ | १८ |
| स्टिकर्स | ............ | ३० |
| पापुद्रा | ............ | ३७ |
| बेघर | ............ | ४८ |
| मालन | ............ | ५९ |
| देवभूमी | ............ | ७१ |
| झुंबर | ............ | ८१ |
| मुंगळे | ............ | १०१ |
| एक दिवस | ............ | ११० |
| कॅक्टस | ............ | १२० |
| विघ्नहर्ती | ............ | १३० |
| तिघी | ............ | १३९ |
| काळजी | ............ | १५१ |
| चिऊताई चिऊताई दार उघड | ............ | १६० |
| मिसफिट | ............ | १७० |
| पुरुष | ............ | १७९ |


✦✦✦

# हुलकावणी

आबा देसाई म्हणजे बघत राहावा असा देखणा, उमदा माणूस. सहा फूट उंची तर नक्की असणार. भरदार अंगयष्टी, गोरापान केशरी रंग, मजबूत ओठांवर सतत मृदू हास्य. लावण्यवतीच्या नाजूक ओठांतून, दातांच्या पांढऱ्या शुभ्र महिरपीनं सजलेलं हसू जणू पाहणाऱ्याला कब्जातच घेत असे. भल्या मोठ्या बंगल्यावर सावली धरणारा हा वटवृक्ष. माणसंच काय, झाडं झुडं, पक्षी, पानं फुलं, पण निवांत नांदत होती.

आज तर आबा देसायाचे पाय भुईवर टिकत नव्हते. गावात सर्कस आली असती तर आबानं त्यातला हत्ती भाड्यानं आणून गावभर साखर वाटली असती. पांढरा शुभ्र पोषाख, त्यावर राजे घेत तसं भरजरी उपरणं, डाव्या हातावर विसावलेलं. भारी अत्तराचा फाया त्यांच्या पावलागणिक सुगंध पसरत चालत रहायचा.

आबा म्हणजे दयावंत, कृपावंत... देवाचं दर्शन घ्यावं मग डोळ्यांवर हात ठेवून आबांचं दर्शन घ्यावं अशी गावकऱ्यांची आबांवर भक्ती. पंचक्रोशीत आबांना शत्रू नसावा इतका गाव बिनधास्त. आज आबांच्या बंगल्याच्या आवारात गावातील प्रतिष्ठीत मंडळी जमली होतीच पण शेतकरी, कामकरी, ऋणाईत पण जमली होती. रिकाम्या हातानं नाही. कुणाच्या हातात फुलं तर कुणाच्या गड्यासोबत फळांची करंडी, शेतातली फळं, भाजीपाला, आज आबांच्या आनंदात सगळा गाव सामील झाला होता.

घरातून पक्वान्नांचा वास उंबऱ्याशी येऊन आल्या गेल्याचं स्वागत करत होता. बायकांच्या बांगड्यांची किणकिण आणि आनंदी हसूचं रुणझुणणं बंगलाभर झिम पोरी झिम म्हणत नाचत होतं. घरातून उदाचा, ओव्याचा, उदबतीचा, तेलाचा वास फुगड्या घालत होता. कामवाल्या सगळं काम सोडून फुलांच्या माळा गुंफण्यात रमून

गेल्या होत्या. गडीमाणसं धांदलीत एकमेकाला भिडत होती. हसून गळामिठी घालत होती.

आबा देसायाला नातू झाला होता. गेली पाच सहा वर्षे देव पाण्यात होते. दान दक्षिणा, नवस सायात, अंगारे धुपारे, शहरात जाऊन पाण्यासारखा पैसा खर्च करून मुलीच्या-सुनेच्या तपासण्यापण झाल्या होत्या. अष्टविनायकाचे उंबरे झिजवून झाले होते. शेवटी देवानं देसायाच्या घराण्याला वारस दिला होता. गोरा गोमटा, आईची ओटी भरेल असा चांगला उंचापुरा.

म्हातारी आजी संगमरवरी देवघरात चंदानच्या पाटावर चांदीच्या देव्हाऱ्यासमोर  बसून जपमाळ ओढत होती. आज तिला 'श्रीराम जयराम'च्या नावाचा लक्ष पुरा करायचा होता. देवानं तिचं साकडं ऐकलं होतं. चांदीच्या तबकातला एकेक चिंचोका कमी होत होता. सुमंगलेनं त्यांच्या पदरात पणतू टाकला होता. आता सोन्याची फु लं उधळून पतवंडाचा मुखडा साजूक तुपात पाहायचा होता. चांदीच्या परातीत, साजूक तुपाची पातळ थर, त्यात मागून पडणारा पतवंडाचा गोड चेहरा...

आजी जप करता करता स्वप्न पाहत होती. सोयर संपायची वाट पाहत होती.

आबा देसाई आपल्या लक्ष्मीसारख्या दिसणाऱ्या बायकोबरोबर आईच्या पाया पडायला आला. पाठोपाठ होता मुलाच्या जन्मानं हरखून गेलेला श्रीहरी... आजीचा नातू. तिघं आजीच्या पाया पडले. आशीर्वाद घेतला... देवघरात जणू पंचायतन अवतरलं होतं.

'आबा, सुनबाईच्या माहेरी साखर पाठवलीस ना!' हो तर, माँसाहेब. व्याह्यांना आणायला खास माणूस मोटार घेऊन सूनबाईच्या माहेरी गेलाय.'

'ठीक. ती माणसं समजूतदार म्हणून त्यांनी ऐकलं, नाहीतर पहिलं बाळंतपण माहेरीच व्हायला हवं म्हणून अडून बसली असती.'

'आजी अगं बाबांनी तर बंगल्यातच दवाखाना थाटला होता. सगळी जय्यत तयारी होती. 'डॉक्टर, नर्स.... अगदी ऑपरेशनची सुद्धा.' श्रीहरी म्हणाला.

'देवाची कृपा, सगळं सुरळीत पार पडलं. सूनबाई सहनशील हो. कळा सहन करीन पण ऑपरेशन नको म्हणायची. तशीच वागली हो.' लक्ष्मीबाई म्हणाल्या.

'सूनबाई, कसा आहे गं माझा पणतू?' कधी पाहीन असं झालंय.'



'आपल्या घराण्याला शोभेल असाच आहे तो माँसाहेब. गोरागोमटा, चांगला लांबसडक'

'लक्ष्मी, सुनेचं खाणंपिणं दूध तूप, तेल पाणी शेक शेगडी स्वत: जातीनं पाहा हो. तुमच्या हल्लीच्या पद्धतीनं तेल नको म्हणू नका. पारगं तेलाच्या तवंगातच तगतं, मजबूत होतं. चोळणारी बाई जाणकार आहे ना?'

'माँसाहेब आम्ही आहोत ना. आपण किती काळजी करणार?'

'जीव ऐकत नाही बाबा. डोळे मिटण्यापूर्वी पतवंड पाहावं म्हणून देव पाण्यात घालून बसले होते. श्रीरामानं ऐकलं माझं गाऱ्हाणं.'

बोलता बोलता म्हातारीनं माळ पदराआड धरली. डोळे मिटून पाठ भिंतीला टेकली.

तिघांनी देवाला नमस्कार केला. देवघरातला चंदनी उंबरा ओलांडला.

बाळाचं मोठ्या थाटाभाटात बारसं झालं. आनंद नाव ठेवण्यात आलं. बारा बलुतेदारांसह सर्व गाव पंचपक्वान्नाचं जेवण जेवलं. बाळ बाळंतिणीला आलेल्या बाळंतविड्याचा, नारळांचा ढीग झाला. सोन्या चांदी मोत्यानं चांदीची ताटं भरली.

सुमंगलेच्या आई वडिलांना आनंदानं रडू फु टलं. आपली देखणी मुलगी आज राजा राणीचा, थाट वैभव कौतुक उपभोगते आहे. आपण काही आबांच्या तोडीचे नाहीत. पण त्यांनी मुलीला मागणी घातली आणि मग एका नारळाचीही अपेक्षा ठेवली नाही. खरा मोठ्या मनाचा माणूस. बरं, वागणं अगदी मानापानाचं. आमचे व्याही व्याही म्हणून ज्याच्या ज्याच्याशी ओळख.

आनंदची मावशी तर बाळाला मांडीवर घेऊन ताईच्या शेजारी शाल घातलेल्या पाटावर बसली होती, बाळ बाळंतिणी बरोबर. कपाळावर कुंकवाचा टिळा तिच्या नाकावर ओघळत होता. बाळ अगदी गरीब हो. रडणं माहीत नाही. कसा मुकाट झोपलाय. नाहीतर बारशाला मूल रडतंच. ज्यानं त्यानं घ्यावं, मुके घ्यावे, आंजारावं गोंजारावं. आहेराच्या वेळी कुंकू लावावे... चौवळून जातं पोर....

'कसलं काय नि काय! आबा साहेबांची सक्त ताकीदच होती, बाळाला कुणी घ्यायचं नाही. मुके तर नाहीतच. अजून तो लहान आहे. मोठा झाला की करा हवे तेवढे लाड.'

'सुनेला तरी कमी जपताहेत का?'

'अहो, या घराण्याला गालबोटच आहे. गेल्या कित्येक पिढ्या एकच मुलगा होती. मुली होतात पण मुलगा एकच. तोही खूप वाट पाहून. नवससायास करून...

'नशीब काढलं हो सुमंगलेनं... त्यांच्या तोडीची मुलगी नसती का मिळाली? मुलींचे बाप मागावर होतेच.'

'काही म्हणा, आबा देसाई भला माणूस, पुण्याई जोडली. ती वाया का जाईल! आता वंशाला दिवा आलाच ना!'

बायका आपापसात बोलत होत्या. पुरुष माना डोलावून न बोलता हेच म्हणत होते.

आनंद बाळ वाढत्या चंद्रकोरीसारखा वाढत होता. त्याच्या बरोबर उभं घर बोबडं बोलत होतं. लुटुलुटु चालत होतं, रांगत होतं. उगवणाऱ्या एकेक दंतकळीबरोबर खुलत होतं. क्षणाक्षणाचे फोटो निघत होते. अल्बमचा थर झाला होता. बाळाचा वाढदिवस म्हणजे मोठं कार्यच. जेवणं, दान दक्षिणा देवधर्म अहेर... नुसती आतषबाजी.

बाळाच्या पाठीवर दोन अडीच वर्षांनी सुमंगलेला जुळं झालं. दोन्ही मुलीच. बाळंतपणाला तिला बराच त्रास झाला. सुनेचा जीव मोलाचा. डॉक्टरांच्या सल्ल्यानं सुनेचं ऑपरेशन करुन मुल होण्याची शक्यता संपवून टाकली.

या दोन्ही मुली आईचं देखणेपण घेऊन आल्या. भावाला बहिणी मिळाल्या. केवढं भाग्य! भावाचं पण बहिणीचं पण. बंगल्याला आणखी शोभा आली. बाललीला पाहताना बंगल्याच्या भिंतीपण सुखावत असत.

दिसामासी जुळ्या बहिणी वाढत होत्या. एकीला झाकावं, दुसरीला काढावं अशा. रिद्धी सिद्धी जशा. सईच्या गालांना खळी पडायची तर जुईच्या उजव्या गालावर ठसठशीत तीळ होता. हीच त्यांची ओळख. एक जरा इंचभर उंचीला कमी. बाकी सगळं सारखं. आजार पडायच्या तर दोघी. बऱ्या व्हायच्या तर दोघी. बऱ्या होईतो घर दार नुसतं हवालदिल असायचं. पण जुई सई दोघी छान वाढत होत्या. म्हातारी जनाक्का चोवीस तास त्यांच्या बरोबर असायची. अंगणात तिन्ही मुलं खेळताना पाहून सगळ्यांचे डोळे निवायचे. मनोमन म्हणायचे माझं आयुष्य दे रे दयाघना यांना...

सई जुईची भातुकली मांडली जायची. सागरगोटे झेलले जायचे. लंगडी घालायची. सात घरात ठिकरी टाकून त्या सीमारेषा ओलांडायच्या भावलाभावलीचं



लग्न मोठ्या थाटात व्हायचं. अगदी खऱ्याखुऱ्या लग्नासारखं. शेजारपाजारच्या मुलींचा घोळका जमायचा. मी वरमाई होणार म्हणून भांडणं व्हायची. वधूमाईकडून पाय धुऊन घेण्याचा आग्रह व्हायचा. एक ना दोन.

जनाक्का सगळ्यांची पुढारी. तिनं सांगावं, मुलींनी ऐकावं. जनाक्काच्या ओव्या ऐकाव्या. तिनं सांगितलेल्या देवादिकांच्या गोष्टी ऐकत पेंगून जावं आनंद पण आपल्या बहिणींच्या खेळण्यात सामील व्हायचा. त्याच्या बरोबरीची मुलं विटी दांडू खेळायची, लगोऱ्या, छप्पापाणी, लपाछपी खेळायची. आनंद मुलींच्या खेळातच रमायचा. भावलीला सजविण्यात त्याला मोठा आनंद मिळायचा. तिला मरण्याचे दागिने करून घालणं, लुगडं नेसणं ओठ रंगवणं, कुंकू लावणं पायात पैंजण बांधणं त्याला फार आवडायचे. भातुकली खेळताना पोह्या चुरमुऱ्याचे डाळ दाण्याचे पदार्थ करू पाहायचा. जनाक्कानं मुलींसाठी केलेले गजरे आपल्या मनगटाभोवती बांधायचा तर कधी हट्ट धरायला, माझ्या केसात पण पिना लावून एक गजरा माळून दे.' म्हणायचा. 'मला गंध नको कुंकू लावा.'

सई जुईच्या मैत्रिणी चिडवायच्या. बायकात पुरुष लांबोडा, भाजून खाता कांबडा. बहिणी चिडायच्या. भाऊ हसायचा. त्याला मजा वाटायची. कुठे लग्न, मुंज असो, बारसं वाढदिवस असो, सण वार असो, पाहावं तर आनंद बायकांच्या घोळक्यात असायचा. त्यांच्या अंगावरच्या साड्या दागदागिने मोठ्या आसक्तीनं पाहत राहायचा.

तिन्ही मुलं शाळेत जाऊ लागली. घरच्या गाडीतून तिघांना शाळेत पोहचवलं जायचं. गाडीत बरोबर असायची जनाक्का. प्यायचं पाणी, घरचं जेवण, ताट वाटी, ग्लास, टॉवेल सगळं जय्यत असायचं. मधल्या सुट्टीत मोटारीत तिघांचं जेवण व्हायचं. दुधा तुपाचं केशरी जेवण ते दृष्ट नको लागायला कुणाची.

जुई सई आपल्या गुणा रूपानं शाळेत आघाडीवर असायच्या. हुशार होत्या दोघी. शाळेला त्यांचा कोण अभिमान! आबा देसायानंच तर सुरू केली शाळा. इमारत बांधली, चांगलं खेळाचं मैदान तयार केलं. उत्तम शिक्षक आणले. त्यांची राहायची सोय केली. भरपूर पगार दिला. कुणी या निमित्तानं शाळा सोडू नये मुलांचं नुकसान होऊ नये हा विचार. थाटात गॅदरींग व्हायचं. चांगलं दोन दिवस. मुलांच्या कला गुणांना वाव मिळायचा. संस्कारक्षम असे विचार मांडणारा पाहुणा असायचा. दोन दिवस

शाळेचाच नाश्ता. शाळेचंच जेवण. पंचक्रोशीतली मुलं या शाळेत धाव घ्यायची. शाळा लहान पडायची. मुलांना परत पाठवावं लागे.

आनंद मात्र शाळेत गेला आणि बुजरा लाजरा होऊन गेला. बरोबरच्या मुलांची संगत नको वाटायची. अलीकडे तर मी मुलंच त्याला टाळू पाहात होती. त्याच्याकडे विचित्र नजरेने पाहात होती. आबांचा धाक होता. दरारा, भीती होती म्हणून कुणी काही बोलत नव्हतं. पण एखादा व्रात्य मुलगा आनंदची नक्कल करायचा. मुद्दाम बायको आवाजात बोलायचा; मुरकत चालायचा, माना वेळवायचा. पाहणारी मुलं ओठावर हात ठेवून हसायची. मिस्कील डोळे टक लावून पाहायचे. सई जुईच्या मैत्रिणी म्हणायच्या,

'असा कसा गं तुमचा भाऊ?'

'असा म्हणजे?'

'बायल्या वाटतो गं. तुमच्याहून मोठा पण तुमच्या पुढे नाहीये. घाबरलेला, चेपलेला वाटतो. वर्गात मागच्या बाकावर बसतो.'

'अगं, त्याच्या वर्गातली मुलं त्याला उगाचच त्रास देतात. त्याची नक्कल करतात त्याचे कपडे ओढतात. अगं एकानं तर त्याच्या बाकावर खडूनं एका बाईचं चित्र काढून ठेवलं...'

दोघी बहिणींना रडू कोसळले. त्याचा भाऊ त्यांना खूप आवडत होता. इतर भावांप्रमाणे त्यांची खोडी काढत नव्हता. त्यांना मारत छळत नव्हता. उलट त्यांच्याबरोबर त्यांचे कपडे खरेदी करण्यात रस घेत होता. त्यांनी नेलपेंट लावलं की, मला पण लाव ना गं म्हणून हट्ट धरत होता. त्यांचे कपडे अंगावर घेऊन आरशात स्वत:ला पाहात होता. त्यांचे दागिने घालून सुखावत होता.

म्हाताऱ्या जनाक्काच्या नेमकं लक्षात आलं. तिचं अनुभवी मन लकूकन हललं. श्वासच थांबला क्षणभर. अन्न, पाणी घ्यावं वाटेन. शेवटी धीर धरून जनाक्कानं म्हाताऱ्या आजीचे पाय धरत आपली शंका बोलून दाखवली. आजी बसल्या ठिकाणी जडशीळ झाली. चेहरा लाल होईतो नाक तोंड दाबून धरलं. म्हातारी आजी जीव द्यायला निघाली जशी. पतवंडांचे हे चाळे आपल्या नजरेत कसे पडले नाहीत म्हणून तिनं टाहो फोडला.

आबा देसायाच्या कानावर आलं तो उभ्या मनोऱ्यासारखा कोसळला. पाठीची कांब पार वाकून गेली. घराला अवकळा आली. स्मशान शांतता पसरली.



सोन्याचा घास माती, भिकारी झाला. आबांची बायको, मुलगा, सून एका दिवसात अचारी बिचारी होऊन गेली. दरिद्री झाली. वैभवात भिकारी झाली. घराच्या भिंतीनी छतानं पण छाती आवळून धरली. गडी माणसं कुजबुजू लागली. आला गेला उगाचच घुटमळू लागला. पाहुणचाराशिवाय परतू लागला. साखरेला मुंग्या लागल्या, गुळाला मुंगळे भिडले. केशर देवघरातल्या सहाण खोडापुरतंच राहिलं. बागेतील फुलं सुकू लागली. फळं रसहीन झाली. गळू लागली.

आनंद मित्रांपासून बाजूला झाला. एकटा राहू लागला. घरातलं वातावरण, स्वत:चा उणेपणा जाणवू लागला. हताश झाला पण काय करावं कळेना, बागेतल्या कोपऱ्यात असलेल्या वडाच्या पारावर एकटा बसून राहात असे. रडत असे. आपल्या बहिणीच्या बरोबर शाळेत जाईनासा झाला. शिक्षणच सोडलं. त्या शाळेत गेल्यावर घरातल्या उदास वातावरणातून निसटण्यासाठी, बहिणीच्या खोलीत स्वत:ला कोंडून घेत होता. तिथे आरशासमोर बसून कुंकू लावून, ओठ रंगवून, केसाच्या झिपऱ्या कपाळावर ओढून, अंगाभोवती साडी गुंडाळून सुखावत होता. त्यांच्या अंथरुणावर निजून उशीचा, चादरीचा वास भरभरून घेत होता. सुखाचा हाच मार्ग असं वाटायचं.

आबा देसायानं आपली वाकली कांब मनोबळावर ताठ केली. आलेल्या दुदैवाला सामोरा जायला सिद्ध झाला. मुलाला, बायकोला, सुनेला धीर दिला पण मातुश्रीनं हाय खाल्ली होती. अन्नपाणी वर्ज्य करून मृत्युपंथाला लागली होती. आबानं घट्ट मनानं ते पण मान्य केलं. म्हातारी डोळे मिटेल तर बरं, आणखी काय काय अनर्थ होणार आहे ते पाहणं तिच्या नशिबी नको यायला. आजवीर महाराणीसारखी मिजाशीत जगली, आता या वयात झुकल्या मानेनं, मनाचा चिखल झालेलं नको जगायला म्हातारीनं.

आबांनी आनंदला शहरातल्या मोठाल्या डॉक्टरांना दाखवलं. ते आणि श्रीहरी या शहरातून त्या शहरात डॉक्टरांचे पाय धरत हिंडत होते. शेवटी कळलं, यावर उपाय आहे. ऑपरेशन करून घ्यायचं. मुलगी करायची. मुलगा विसरायचा.

ठीक आहे. परदेशी जाऊ. दोन बहिणींना तिसरी बहीण घेऊन येऊ. आबा देसाई खंबीर होता. निश्चयी होता.

श्रीहरी आणि सुमंगलेनं तोंडात बाळा कोंबला. मुसक्या बांधल्यासारखे गुदमरू लागले. अन्नाची ताटं भरली राहू लागली.

सई-जुई बापुडवाण्या झाल्या. काय झालंय, त्यांना कळेना. जनाक्काला विचारावं तर तिच्या डोळ्यांना खळ नव्हता. नुसती टुकु टुकु पाहत राहायची. आनंद आपल्या खोलीत झोपतो, आपल्या साड्या गुंडाळतो. हे सर्व जुईच्या लक्षात आल्यावर देसायांच्या त्या मुली खवळून उठल्या. थोरल्या भावावर ओरडू नये ही शिकवण विसरून त्यांच्या अंगावर धावून गेल्या. त्यानं पण रागावून बहिणींना मारलं... थाड थाड.... कसले हात लागले. गाल लाल झाले, ते सुजलेच राक्षसी बळ त्यांच्या अंगात शिरलं होतं तसं.

सुमंगलेचा धीर सुटला. विवेक हरपला. सासऱ्याचा धाक विसरली आणि या दळभद्र्या दतद्रष्ट मुलाला बडवू लागली. तो रडत होता, पळत होता. पण हिचा राग काही केल्या कमी होईना. जनाक्कानं त्याला पाठीशी घातलं. तर तिलाही दोन धपाटे घातले.

'सूनबाई, डोकं फिरलं की काय? घरात कुणाचा धाक वाटत नाही? मुलाला बडवलंस? का? कुणाला विचारून?'

'विचारायचं का नि कशाला? माझं मूल आहे. मारेन नाहीतर जीव घेईन.'

'चालती हो माझ्या डोळ्यांसमोरून....' आबांनी थरथरत तिथेच बसकण घातली.

या दैवी संकटानं सगळ्यांची माथीच फिरली होती जशी. दुःखानं जो तो वेडापिसा झाला होता. विवेक म्हणून राहिला नव्हता. आतड्यांना पीळ पडला होता. या घराण्यात जे कधीच घडलं नव्हतं, ते घडलं होतं. निर्वंश झाला होता. अब्रू गेली होती. प्रतिष्ठा मातीमोल झाली होती. पण आबा अजूनही आशेला बिलगून होते.

परदेशी पत्रव्यवहार केला. इथल्या डॉक्टरांचे रिपोर्ट पाठवले. मुलाचे फोटो पाठवले. त्यांना त्याचे संबंध शरीराचे उघडे फोटो हवे होते. इतक्या दूरवर जायचं तर त्यांना सगळी माहिती पुरविणं आवश्यक होतं. मुलाचा उघडा फोटो काढायचा म्हटल्यावर बाप लेकानं एकमेकाची नजर चुकविली. आबांनी आपल्या श्रीहरीच्या पाठीवर थरथरता हात ठेवला. कुणा फोटोग्राफरकडे न्यायचं? आपले दिवस फिरलेत. घराचे वासे फिरलेत तो फोटोग्राफर फोटोची निगेटिव्ह न देता त्यासाठी पैसा मागू लागला, जन्मभर छळ करत राहिला, तर काय घ्या! मुख्य म्हणजे आनंदचा असा अपमान करणं त्यांना शक्य नव्हतं. त्या पोराला सहानुभूतीने, प्रेमाने, मायेने



वागवा, त्याला आपल्या उणिवेची जाणीव होऊ देऊ नका. हे प्रत्येक डॉक्टरानं मानसोपचार तज्ज्ञानं सांगितलं होतं. तिथे जायचं, तिथेच फोटो काढायचे. परदेशात अशा गोष्टी सहज म्हणून स्वीकारल्या जातात. ऑपरेशननंतर ती मुलगी सामान्य जीवन जगते.

'अहो, आपल्या आनंदला ऑपरेशननंतर पाळी येईल? तिला शारीरिक सुख देता घेता येईल? मूल होईल?'

सुमंगला आपल्या नवऱ्याच्या कुशीत शिरून नाना प्रश्न विचारत होती.

त्याच्याजवळ उत्तर नव्हतं. तो वैतागून तिला बाजूला करून पाठ वळवून डोळे मिटत होता. झोप यावी म्हणून गोळ्या खात होता.

'सूनबाई, तुला पण यायचंय बरोबर.'

'मी? नको, मला नाही ते काही पाहावयाचं. सासुबाईना न्या. मी पाहते घरदार.'

'नाही. तू श्रीहरी आनंद मी जायचं ठरलंय.'

'पण...'

'अलीकडे फार प्रश्न विचारू लागलीस. मला हे चालत नाही. दैवानं दावा साधलाय. तुम्ही नका छळू. बांधा आपलं सामान.'

'पण आबा तिची प्रकृती ही अशी.'

'श्रीहरी, हा तुझा बाप तुझ्यासमोर उभा आहे खरा. पण माझ्या काळजाची चाळणी झाली आहे. उभ्या देहाला वाळवी लागली आहे. अरे आयुष्य म्हणजे तापलेला तवा आहे. भाकरी भाजली जाते हातपण पोळतो. बोलून ठेवलयं बहिणाबाईनं. सुनबाई, तुला तिकडे नेतोय ते उगाच नाही. तिथे तुझ्यावर उपचार करून तुझी प्रकृती सुधारायची. मग तू मला नातू द्यायचा पूर्ण पुरुष..'

सुमंगला अंगभर थरथरली.

'आबा हिचं तर...'

'ऑपरेशन झालेय. ठाऊक आहे. मला परत ऑपरेशन करता येते. मूल होतं. मी हवेत बोलत नाही. सगळी चौकशी केली आहे. या आबा देसायानं स्वतःच्या हातावरच्या रेषा स्वतः खोदल्या आहेत. आज दैवानं उभा दावा मांडलाय खरा. कर्तृत्वानं दैव पण नमवता येतं. या आबाला हार ठाऊक नाही. मी आजोबा झाल्याशिवाय मरणार नाही. घराण्याला वंशज हवा. कळतंय ना?'

कळत होतं आणि नाही पण. या डोंगराएवढ्या माणसापुढे काय बोलणार? प्रत्येक प्रश्नाला उत्तर होतं त्यांच्याजवळ; प्रत्येक शंकेचं समाधान होतं.

परदेशी जायचं म्हणजे नुसते पैसा असून चालत नाही. पैसे टाकून डॉलर मिळवता येतात. पण पासपोर्ट, व्हिसा मिळविता मिळविता हेलपाट्यानं दमून जायला होतं. चार महिने लागलेच. तोवर उभ्या गावाला आबा देसायाच्या खटपटीचा पुरता सुगावा लागला होता. घरोघरी हळहळ व्यक्त होत होती. या पुण्यपुरुषाच्या नशिबी असं अघटित घडायला नको होतं असं वाटत होतं. त्याच बरोबर कुत्र्याच्या छत्रीसारखे हितशत्रू पण उगवले होते.

आनंदचा एकाकीपणा, बुजरेपणा वाढत होता तो या तयारीत, धावपळीत कुठेच नव्हता. त्याच्यासाठी सगळं घडत असूनही तो कशातच नव्हता.

उद्या मुंबईसाठी निघायचं. गाड्या तयार ठेवा. सामान सुमान नीट पाहून घ्या. सासू-सून नाना पदार्थ करीत होत्या. डोळ्यांचे पाणी मायेनं म्हणून त्यात ठिबकत होतं. कशाचा आनंद, उमेद वाटत नव्हती. हुरहुर वाढतच होती. निराशा, अपयश दूर लोटता लोटता हात दमत होते. म्हातारी आजी तर अंथरुणाला खिळून होती. डोळ्यांनी पाहात होती. कानानं जेवढं ऐकू येईल तेवढं ऐकत होती. जीव कातडीला जसा चिकटून राहिला होता.

उद्या निघायचं. गावातल्या चार मित्रांना बोलावून सई, जुई, आई, बायको यांच्याकडे लक्ष ठेवा. रोज एकदा बंगल्यावर येऊन जा म्हणून सांगायच्या आधीच त्यांनी ही जबाबदारी उचलायची तयारी दाखवली. नव्हे, तसं ते करणारच होते. आबांचा जीव खाली पडला. देवापुढे लोटांगण घातलं,

'देवा, ही शेवटची लढाई हे युद्ध तेवढं जिंकू दे. मग काहीही मागणार नाही. हा जीव तुला अर्पण करीन.'

'मालकऽऽ...' जिवाजी समोर थरथरत उभा होता. भल्या पहाटे जिवाजी मालकाला उठवीत होता.

'मालक...'

'काय रे काय झालं?'

'आपलं आनंदराव नाहीसं झालं..'

'काऽऽय...' उभा बंगला या दणदणीत आवाजानं जागा झाला. गोळा झाला. अंथरुणाला खिळलेली म्हातारी आजी तर जागच्या जागी थिजून गेली.



'कसा? केव्हा?कुठे? कुणा बरोबर?

सगळ्याला एकच उत्तर मिळालं 'त्या' पंथाच्या लोकांनी त्याला आपल्या कंपूत ओढून नेलं होतं. तो राजीखुशी त्यांच्याबरोबर गेला होता. पण नजर कशी चुकवली? वेळ कशी साधली? हा एकटा कुठे न जाणारा कुठे, केव्हा गेला? कसा सापडला त्यांच्या जाळ्यात? कोण हितशत्रू या कटामागे होते?

आबा देसायानं फोन उचलला... 'पोलीस.. पोलीस.. मी आबा...'

घामाघूम होऊन आबा कोचावर कोसळले, तोड वाकडं झालेल्या हातपाय लुळे झालेल्या मालकाला म्हातारा जिवाजी मिठी मारून धाय मोकलून रडत होता.

✦✦✦

## पांघरूण

'वा... आत्मा तृप्त झाला. गेले चार सहा दिवस रोज निराळा पदार्थ पानात पडतो आहे. बायको, तुमचा शिष्य तुमच्यापेक्षा सुगरण झाला बरं का!'

सुमित्रा नवऱ्याचे सुखाचे बोलणे ऐकत होती. गेले काही दिवस ती आजारीच होती. सुनेनं सगळा कारभार हौसेनं उचलला होता. तिच्या चेहऱ्यावर आगळंच तेज आलं होतं. स्वामित्वाचं, स्वातंत्र्याचं, स्वतःच्या कर्तृत्वाचं. प्रगती हे कर, ते कर, असं नको, तसं नको असं सांगणाऱ्या आपण अंथरुणावर पडून आहोत. नवऱ्याचं, सासऱ्याचं सगळं व्यवस्थित करत होती. आपलंही पथ्यपाणी सांभळत होती. कामवाली पण नेमकी आली नाही. धुणं, भांडी, केरवारा पण प्रगतीनं सहज उरकला होता. ती दमत नव्हती, कामला कंटाळत नव्हती. कारण कष्टांचं, मेहनतीचंच बाळकडू तिला मिळालं होतं.

'बायको, ऐकते आहेस ना! मघापासून मी काय म्हणतोय?'

सुमित्रानं नवऱ्याकडे डोळाभर पाहिलं, बोलली नाही.

'कसला विचार चाललाय एवढा?' बाबूरावांनी विचारलं.

'अं? काही नाही. वामकुक्षी झाली वाटतं?'

'हो. हो. निवांत झोपलो. तू काय खाल्लंस? भूक लागतेय ना? खायला हरकत नाही असं डॉक्टर म्हणालेत.'

'चहाची वेळ झाली असेल. तुम्हाला चहा गरम गरम लागतो.'

'एक वेळ घड्याळाचा ठेका चुकेल पण प्रगतीची वेळ चुकणार नाही. तू पण चहा घे ना. दोघं चहा पिऊ गप्पा मारू.'

'नको हो. या आजारपणात चहाचा वाससुद्धा नको वाटतोय. काय झालंय कुणास ठाऊक!'



प्रगतीनं सासऱ्यासाठी गरम गरम, दुधाळ चहा आणला. त्या ट्रेमध्ये सासूसाठी नारळाचं पाणी होतं. दोघांनी तिच्याकडे कौतुकाने पाहिलं. ती लाजूनच पळाली.

'बायको, हे सगळं श्रेय तुझं आहे. तू जन्म दिला एका मुलाला, पण वाढवलंस दोघांना... मुलाला आणि सुनेला पण...'

'देवानं यश दिलं खरं. नाहीतर सगळं कर्मकठीणच होतं. याच मुलीची दुसरी बाजू पाहा. घराला घरपण राहिलं नसतं. माणसाचे संस्कार इतक्या सहजपणे पुसले जात नाहीत, पाण्याला तुरटी लावून त्यातला गाळ खाली बसतो. पण माणसाच्या मनातला गढूळपणा प्रेमानं, मायेनंच निवळतो.'

'जे काय झालं, घडलं, जो चमत्कार झाला, तो तुझ्या समंजस शहाणपणामुळे. तेच हात आवरून घेतले असतेस तर आपला संसार विखुरला असता. धन्यच आहे तुझी.'

'पुरे. क्लबला जायचं नाही वाटतं?

'हो जातो... बसा सासू-सून गप्पा मारत.'

नवरा निघून गेला. 'गप्पा मारत?' ती तर कामाशिवाय बोलत नाही. गप्पा कुठल्या मारतोय आम्ही! मुख्याध्यापिकेला घाबरावं तशी ती आपल्यापासून अंतरावरच असते. वाद घालत नाही. असं का म्हणून विचारत नाही. खरं तर घरातली सून म्हणून तिला सगळे अधिकार दिलेत, मोकळेपणा दिलाय पण दडपणाखालीच लग्न होईतो जगली. तिच्या मनावरचं ते ओझं आपल्या आत्मीयतेनंही दूर झालेलं दिसत नाही.

'संध्याकाळी स्वयंपाक काय करू? प्रगती विचारत होती.

'तुला हवं ते, आवडेल ते कर....'

मामंजींना, ह्यांना आज खिचडी पापड हवाय. शिवाय कढी.'

'हो का, मग करायचंच ते.'

'तुम्ही काय खाणार?'

'त्यातले चार घास खाईन. अजून भूक जागी झाली नाही.'

'माझ्यासाठी भाकरी टाकू? तीळ लावून?

'होऽऽ त्यात काय विचारायचं ग? ताज्या ताज्या भाकरीवर लोणीपण घे.'

'लोणी?'